



दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार ३० डिसेंबर २०२४ | अंक२१● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# शेतकऱ्यांसमोर संकट, महाराष्ट्रातील या भागात वादळी वाऱ्यासह पाऊस

**अरबी समुद्रात निर्माण झालेल्या बदलांमुळे राज्यात पाऊस होत आहे.**



महाराष्ट्रातील शेतक-्यांसमोर पुन्हा अवकाळी पावसाचे संकट उभे राहिले आहे. राज्यातील काही भागांत वादळी वा-्यासह पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. हिवाळ्यात राज्यात होत असलेल्या पावसामुळे शेती पिकांचे नुकसान होणार आहे. उत्तर म हाराष्ट्र, मराठवाडा या भागांत ३०–४० किलोमीटर वेगाने वारे वाहणार आहे. तसेच या भागांत पावसाचा इशाराही पुणे येथील ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ के.एस.होसाळीकर यांनी दिला आहे.का होतोय पाऊस? अरबी समुद्रात निर्माण झालेल्या बदलांमुळे राज्यात पाऊस होत आहे. दक्षिण केरळ लगतच्या अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. समुद्र सपाटीपासून ३.१ किलोमीटर उंचीपर्यंत चक्राकार वा-्यांची स्थिती सक्रिय आहे. त्याचा परिणाम महाराष्ट्रातील वातावरणावर होत आहे. यामुळे राज्यात दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी पाऊस अनब गारपीट होत आहे. राज्यातील जवळपास १२ ते १३ जिल्ह्यांत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव या जिल्ह्यांमध्ये वादळी वारे ३० ते ४० किलोमीटर वेगाने वाहणार आहे. तसेच अनेक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

## जळगाव जिल्ह्यात पाऊस

जळगाव जिल्ह्यांत सलग दोन दिवसांपासून अवकाळी पाऊस सुरू आहे. यामुळे पिकांना मोठा फटका बसला आहे. अवकाळी पावसामुळे ज्वारी, दादर तसेच केळी आणि हरभरा या पिकांना मोठा फटका बसला आहे. जळगाव तालुक्यातील काही गावांमध्ये वादळी वा-्यासह पावस झाला. त्यामुळे ज्वारी, दादर ही पिके जमीनदोस्त झाली आहे. अवकाळी पावसामुळे हरभ-्यावर रोगांचा प्रादुर्भाव होणार आहे. हरभ-्याचे उत्पन्नात मोठी घट होण्याची शक्यता आहे. रावेर व यावल तालुक्यात केळीच्या पिकाला सर्वाधिक फटका बसला असून केळी उत्पादक शेतक-्यांचे देखील त्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. तूर काढणीवर आली असताना झालेल्या पावसामुळे तुरीचे सुद्धा मोठे नुकसान होण्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे. अद्यापही कृषी विभागाकडून नुकसानीचे पंचनामे करण्यात आलेले नाही. पंचनामे करून भरपाई द्यावी, अशी मागणी शेतक-्यांकडून केली जात आहे.

## हातात बंदूक घेऊन फोटो काढणाऱ्यांवरही कारवाई

पाटोदा । प्रतिनिधी राज्यभरात गाजत असलेल्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर पाऊले उचलले आहेत. या प्रकरणातील फरार आरोपींविरोधात कडक कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांसह सीआयडीला दिले आहे.मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना अटक करावी, या मागणीसाठी बीडमध्ये शनिवारी सर्वपक्षीय मोर्चा निघाला होता. या मोर्चात हजारोंच्या संख्येने लोक सहभागी झाले होते. या मोर्चानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर पाऊले उचलत संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याचे निर्देश पोलिसांना दिले आहेत. ही प्रक्रिया तात्काळ सुरू करावी असे म्हटले आहे. तसेच, बीड जिल्ह्यातील अनेकांचे हातात बंदूक असलेले फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अशा सर्व फोटोतील बंदूक खरे असतील तर संबंधितांचे शस्त्र परवाने तात्काळ रद्द करावे असे आदेश देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांसह सीआयडीला दिले आहेत

## गुंडप्पा यलगंधलवार यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा ताल-ुक्यातील उमरा येथील पद्मशाली समाजातील जेष्ठ नागरिक गुंडप्पा काळबा यलगंधलवार वय ९२ वर्षे यांचे दि.२८–डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता निधन झाले असून त्यांच्या पार्थिवा-वर दि.२९– डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता उमरा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. गुंडपा यलगंधलवार त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातू, पणतू असा परिवार आहे, ते मोहन यलगंधलवार बालाजी यलगंधलवार यांचे वडील होत.

## क्षेत्र शनि मंदिर बीड येथे भागवत कथा व कीर्तन महोत्सवाचे आयोजन

शहरातील जुना मोंढा रोड शेजारील शनिमंदिर येथे श्री शनी जन्मोत्सवा निमित्त भव्य दिव्य संगीतमय श्रीमद् भागवत कथा व किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून बीड येथील सुप्रसिध्द भागवताचार्य सचिन महाराज सपकाळ यांच्या मधूर, अमृततुल्य वाणीतून भागवत कथा निरुपण होणार आहे. कथेची सुरूवात बुधवार दि.१ जानेवारी २०२५ रोजी तर सांगता मंगळवार दि.७ जानेवारी रोजी होणार असुन श्रीमद् भागवत कथेची वेळ दररोज दुपारी १ ते ५ अशी ठेवण्यात आलेली आहे. या भागवत कथेसाठी मातोश्री संगीतमय गायनाची साथ ह.भ.प.श्रीमती कुसुमताई सपकाळ , ह.भ.प. माऊली महाराज घुमरे , ह.भ.प. पवन महाराज सपकाळ तर तबला साथ ह.भ.प. जगन्नाथ महाराज कराळे यांची सुंदर संगीत साथ लाभणार आहे. अखंड हरिनाम सप्ताहामध्ये दि.१ जानेवारी बुधवार ह.भ.प. कैलास महाराज गवळी गेवराई, दि.२ गुरूवार ह.भ.प. भाऊसाहेब महाराज धांडे खांबा लिंबा,दि.३ ह.भ.प. परशुराम महाराज मराडे तळेगाव,दि.४ ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे बीड, दि.५ ह.भ.प. गणेश महाराज वारंगे मादळमोही, दि.६ ह.भ.प. त्र्यंबक महाराज मातकर वरवटी, दि.७ ह भ प श्रीकृष्ण महाराज उबाळे चऱ्हाटा, यांचे रात्री ८ ते १० या वेळी किर्तन होणार आहे. दि.४ शनिवार रोजी दुपारी ४ ते ५ यावेळी ह.भ.प नितीन महाराज पिसाळ यांचे प्रवचन होणार आहे. दि.८ जानेवारी बुधवार रोजी ह. भ. प. लक्ष्मण महाराज मेंगडे संस्थान बंकटस्वामी मठाधिपती नेकनूर यांचे सकाळी १० ते १२ रोजी काल्याचे किर्तन होणार आहे व नंतर महाप्रसाद वाटप होणार आहे तरी या संगीतमय भागवत कथा व किर्तनाचा लाभ घेण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे अशी विनंती शनी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष रामनाथ खोड व भक्त मंडळींनी केली आह

## जय भगवान महासंघाची बीड तालुका कार्यकारीणी जाहीर



संत वामनभाऊ महाराज, संत भगवान बाबा व लोकनेते स्व. गोपिनाथरावजी मुंडे साहेब यांचे विचार व कार्य सर्वसामान्य युवकां पर्यंत व सर्वसामान्य लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी जय भगवान महासंघ राज्यामध्ये काम करत आहे. जय भगवान महासंघाची काल जय भगवान महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब सानप यांच्या उपस्थितीमध्ये बीड तालुका कार्यकारीणी पार पडली. यावेळी जिल्हा उपाध्यक्षपदी अनंत नागरगोजे, जिल्हा संघटकपदी नितीन हांगे, तालुका अध्यक्षपदी विनायक मुंडे, शहराध्यक्ष पदी संदिप वनवे, शहर संघटक पदी बाळासाहेब वनवे यांची निवड करण्यात आली. यावेळी शिवराज बांगर, जिल्हाध्यक्ष अविनाश सानप, सुरज जायभाये, संदिप तांदळे, पप्पु हांगे यांच्यासह आदी शेकडो युवक उपस्थित होते.

## प्राजक्ता माळीने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. यावेळी प्राजक्ताने मुख्यमंत्र्यांसमोर आपली व्यथा मांडली. यानंतर मुख्यमंत्र्यांनी मतुमच्या सन्मानाला कुठेही बाधा येईल असं कृत्य खपवून घेणार नाहीफ़ असं आश्वासन दिलं आहे. अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या ङ्गसागरफया शासकीय निवासस्थानी जावून भेट घेतल्याची माहिती समोर येत आहे. प्राजक्ता माळी हिने काल पत्रकार परिषद घेत भूमिका मांडली होती. भाजप आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका करताना परळीतील इव्हेंट मॅनेजमेंटचा उल्लेख करत प्राजक्ता माळी, रश्मिका मंदाना आणि सपना चौधरी यांची नावे घेतली होती. सुरेश धस यांनी प्राजक्ता माळी हिचं नाव घेतल्यानंतर विविध चर्चांना उधाण आलं होतं. अखेर या प्रकरणी प्राजक्ता माळी हिने आक्रमक पवित्रा घेत राज्य महिला आयोगाकडे तक्रार केली. यानंतर तिने पत्रकार परिषद घेत भूमिका मांडली. त्यानंतर प्राजक्ता माळी हिने आज मुख्यमंत्र्यांची सागर बंगल्यावर जावून भेट घेतल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, प्राजक्ताला सध्या सर्वच स्तरातून समर्थन मिळत आहे. सुरेश धस यांनी आपल्या वक्तव्यावर माफी मागावी आणि त्यांचा निषेध करावा, या मागणीसाठी प्राजक्ता माळी हिने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याची माहिती आहे. प्राजक्ता माळी हिने याबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिलं आहे. प्राजक्ताने मुख्यमंत्र्यांसोबत या विषयावर जवळपास १५ ते २० मिनिटे चर्चा केल्याची माहिती आहे. प्राजक्ताने मांडलेल्या मुद्द्यांनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योग्य कारवाई करण्याचं आश्वासन दिल्याची देखील माहिती आहे. महिलांचा अपमान महायुती सरकार सहन करणार नाही, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी प्राजक्ता माळीला दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. प्राजक्ताची मुख्यमंत्र्यांसोबत सकारात्मक चर्चा यासोबतच हवी ती मदत महायुतीकडून केली जाईल. तसेच कुणाच्याही इमेजला गालबोट लागू देणार नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. प्राजक्ता माळी हिचं देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाली आहे. यावेळी प्राजक्ताने आपली व्यथा मांडली.

## वाल्मिक कराडला पुणे येथुन अटक; सि आय डी पथकाची जबरदस्त कार्यवाही



केजः– मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या खूनप्रकरणाचा म ास्टरमाईड असल्याचा आरोप होत असलेला वाल्मिक कराड याला पुणे येथून अटक करण्यात आली आहे. सीआयडीच्या पथकाने ही कारवाई केल्याची माहिती आहे. वाल्मिक कराड याच्यासह फरार आरोपींची संपत्ती देखील जप्त करण्यात आली आहे. तसेच वाल्मिक कराड याच्या नातेवाईकांची देखील बँक खाती गोठवण्यात आली आहेत. वाल्मिक कराड याचेही बँक खाते गोठवण्यात आले आहे. देशमुख हत्या प्रकरणा-तील फरार आरोपी फरार आरोपी क्रमांक १ – सुदर्शन घुले फरार आर-ोपी नंबर २ – कृष्णा आंधळे फरार आरोपी नंबर ३ – सुधीर सांगळे जयराम चाटे, महेश केदार, प्रतीक घुले, विष्णू चाटे या चौघांना पोलि-सांनी आधीच अटक केलीय. तसेच या प्रकरणात मास्टरमाईड म्हणून वाल्मिक कराडच नाव घेतलं जातय. विरोधकांसह सत्ताधारी आमदारांनी देखील वाल्मिक कराडवर या हत्या प्रकरणात संशय व्यक्त केला आहे. असं असलं तरी पोलिसांनी वाल्मिक कराडवर फक्त खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे वाल्मिक कराडला कोणत्या गुन्ह्याखाली अटक करण्यात आलीय का ? हे पाहणे महत्वाच ठरणार आहे.

## गुन्हे दाखल असलेल्या २६० बंदूक परवाने रद्द होणार

बीड जिल्ह्यातील २६० जणांवर गुन्हा दाखल असून त्यांचा परवाना रद्द करण्याबाबत पोलीस प्रशासनानेही जिल्हा प्रशासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. मात्र जिल्हा प्रशासनाकडून हे परवाने रद्द करण्यासाठी चालढकल केली जात होती. अखेर २६ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील गुन्हे नोंद असलेल्या तब्बल २६० जणांना नोटीस देण्यात आली आहे. त्यामुळे हे शस्त्र परवाने रद्द होणार असल्याचे दिसत आहे. अप्पर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी गुन्हे दाखल असलेल्या २६० शस्त्र परवाना धारकांना काढलेल्या नोटीसमध्ये म्हटले आहे की, पोलीस अधीक्षक यांचे पत्रान्वेय गुन्हे दाखल असलेल्यांची माहिती कार्यालयास प्राप्त झाली आहे.

# जिल्ह्यातील एकही नेता नाही ज्यांच्या कार्यकर्त्याकडे शस्त्र परवाना नाही!

## स्वतःच बोंबलत फिरायचे अन् स्वतःच शिफारस करायची असे दळभद्री नेते बीड जिल्ह्यातच!

बीड जिल्ह्यामध्ये शस्त्र परवाना हा चांगलाच चर्चेत आला असून, ज्यांच्याकडे बंदूक शस्त्र परवाना आहे त्यांची वापरण्याची पद्धत यावर आक्षेप घेतला गेला आहे. खरे तर शस्त्र परवाना मिळवून देण्यामध्ये सगळ्याच लोकप्रतिनिधींचा सहभाग असून कोणा एकाचे नाव घेणे चुकीचे ठरणारे आहे. आपले स्वतःचे कार्यकर्ते जोपासण्यासाठी सगळ्याच नव्या जुन्या आमदारांनी प्रयत्न केले असून त्यातूनच हे शस्त्र परवाने देण्यात आले आहेत. आता जरी सगळे फुशारकी मारीत असले तरी शस्त्र परवाने मिळवून देण्यात या सगळ्यांचा पुढाकार त्या त्या वेळी राहिलेला आहे. बीड जिल्ह्यातील एकंदर सगळ्या घटनावरून राजकीय आणि सामाजिक वातावरण तापलेले आहे. आमदार सुरेश धस यांनी नागपूरच्या अधिवेशनामध्ये बीड जिल्ह्यातील शस्त्र परवाण्याचा विषय चव्हाट्यावर आणला. ज्यांना गरज नाही अशांना आणि अमाप लोकांना शस्त्र परवाना देण्यात आले असा आरोप त्यांनी केला. त्यानंतर अनेकांनी बंदूकधारी लोकांचे फोटो आणि त्यांनी केलेली फायरिंग सोशल मीडियातून उघड केली. या प्रकरणात काही जणांवर कारवाई झाली आणि अजून काही जणांवर कारवाई होत आहे. आता यातील २०० हून अधिक लोकांना नोटीस पाठविण्यात आली आहे. जिल्ह्यामध्ये हजार पेक्षा अधिक परवाने असलेले हा विषय ऐरणीवर आला आहे मात्र अशी शस्त्र परवाने काढून देण्यासाठी कोणा एकाचे नाव घेणे चुकीचे वाटते. कारण आपल्या जवळच्या कार्यकर्त्याला शस्त्र परवाना मिळवून देण्यासाठी सगळ्याच लोकप्रतिनिधींनी यापूर्वी प्रयत्न केलेले आहेत. सगळ्याच आमदारांनी आपापल्या पद्धतीनुसार प्रशासनाला शिफारस केली आणि अनेकांना शस्त्र परवाने मिळवून दिले शिवाय मिळालेल्या शस्त्र परवान्याचे नूतनीकरण करण्यासाठी सगळ्यांनीच शिफारशी केलेल्या असल्याचे यापूर्वी दिसून आले आहे. आपापले हितसंबंध आणि कार्यकर्ते जोपासण्यासाठी, त्यांना पोस्ट करण्यासाठी गरज नसताना शिफारसी करण्याचे प्रकार सगळ्यांकडून करण्यात आलेले आहेत. शस्त्र परवाना मिळाल्यानंतर त्याचा गैरवापर झाल्याचा प्रकार अत्यंत बोटावर मोजणे एवढा असू शकतो, मात्र शस्त्र मिळाल्यानंतर त्याची शायनिंग मारण्याची पद्धत सगळीकडे दिसून येते. कोणी शस्त्राचा धाक दाखवून दहशत माजविली असे प्रकारही अत्यंत कमी म्हणजे एक–दोन असू शकतात. पण शस्त्र परवाने वाढण्याचे कारण म्हणजे आमदारांनी आपापल्या विभागातील कार्यकर्त्यांची केलेली शिफारस हे तेवढेच सत्य आहे. प्रत्येक तालुक्याची शस्त्र परवानाधारकांची संख्या बघितली तर ती कमी अधिक आणि एखाद्या तालुक्यात ती जास्तीची असू शकते. मात्र ज्याच्या तालुक्यात ही शस्त्र परवाने मिळाली त्याला कोणाची शिफारस आहे, हे तपासले तर आजी–माजी आमदार यामध्ये पुढे असल्याचे स्पष्टपणे दिसते. माजी जिल्हाधिकारी सुनील केंद्रेकर हे जिल्हाधिकारी असताना त्यांनी अनेकांचा शस्त्र परवाना रोखला होता. तुम्हाला शस्त्र हवं असेल तर कशासाठी हवेत याची विचारणा करीत झाडाझडती त्यांनी घेतली होती. त्याही वेळी अनेक आमदारांनी केंद्रेकर साहेब यांना फोन करून संबंधित आपल्या कार्यकर्त्याला शस्त्र परवाना देण्याचे सांगितले होते. अनेकांच्या शस्त्र परवान्याचे नूतनीकरण केंद्रीकरांनी अडविले त्याही वेळी त्यांना शिफारशी करण्यात आल्या, अर्थात केंद्रेकर साहेबांनी सगळ्या बाबी तपासूनच नूतनीकरण करून दिले आणि बऱ्याच जणांना मात्र दिले नाही



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ३० डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## संपादकीय

### कॅलेंडर आणि आपणही बदलूया

नवे वर्ष सुरु झाले की, आपण भिंतीवरचे कॅलेंडर बदलतो. आता त्याबरोबरच स्वतःलाही बदलण्याची वेळ आली आहे. आपण शांतपणे आपल्या वाईट सवयीची यादी केली तर आपल्यालाच थक्क व्हायला होईल! आपला कितीतरी वेळ आजकाल मोबाईलमध्ये जातो. सोशल मीडिया सर्च हा एक नवा रोग प्रत्येकाला लागला आहे. लहान मुलांपासून तर मोठ्यांपर्यंत प्रत्येक जण कितीतरी वेळ सोशल मीडियावर वाया घालवतात. त्यात काही माहिती निश्चितच ज्ञानात भर घालणारी असते. मनोरंजन करणारी असते, पण त्या पायी आपण आपली मूळ कर्तव्ये विसरत चालतो. मुले अभ्यासाकडे दुर्लक्ष करताहेत. घरातला एकमेकांशी संवाद कमी झाला आहे. अगदी जेवताना सुद्धा आपली बोटे मोबाईल स्क्रीनवर खेळत असतात. त्यामुळे आपले वाचन कमी झाले आहे. कुणाच्याच हातात पुस्तकं दिसत नाहीत. कुणीही ग्रंथालयात जाताना दिसत नाहीत. नव्या वर्षात हे बदलायला हवे. कोणतीही सवय एकदम जात नाही, हळूहळू जाईल. पण प्रयत्न तर करायला हवेत ना? घरातली मुले वृद्ध मंडळींशी बोलत नाहीत. वय झाले की एकटेपण वाढत जाते. हातातून बरेच काही निसत चालले आहे ही भावना आतल्या आत पोखरत असते. अशावेळी इतरांचा आधार हवाहवासा वाटतो. पूर्वी लग्न समारंभ, सणवार या निमित्ताने का होईना कुटूंबातली माणसे एकत्र जमायचे. आता एकमेकाकडे जायला वेळ नाही. मुख्य म्हणजे तशी गरजच भासत नाही. मी बरा अन् माझे लहानसे कुटूंब बरे अशी कुपमंडूक वृत्ती वाढीला लागली आहे. नव्या वर्षात नव्याने नाती जोपासायला शिकले पाहिजे. आपल्यातली सहनशीलता कमी होत चालली आहे. पटकन राग येतो प्रत्येकाला. आवाजात मार्दव राहिले नाही. आपलेच म्हणणे खरे करण्याचा अट्टहास. दुसऱ्याचे ऐकून घ्यायचेच नाही. बस, मेरे मुर्गि की एकही टांग.. ही एकांगी वृत्ती वाढली आहे. अशाने कुठल्याही समस्या सुटत नाहीत. आपण समंजस व्हायला शिकले पाहिजे. क्षमा करायला शिकले पाहिजे. दोन पावले पुढे जायचे असेल तर त्याआधी एक पाऊल मागे घ्यायला शिकले पाहिजे. तरच मानवी नाते संबंध टिकतात. नव्या वर्षाचा संकल्प म्हणून नाती जोपासायला प्राथमिकता दिली पाहिजे. विज्ञान तंत्रज्ञानाने आजच्या जगाचा चेहरा– मोहरा बदलून टाकला आहे. भविष्यात आणखीन नवे बदल अपेक्षित आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता नावाचे नवे वादळ येऊ घातले आहे. या सर्व आधुनिक तंत्रज्ञानाचे जसे फायदे तसेच तोटेही आहेत. आपल्याला या परिवर्तन चळवळीपासून अलिप्त राहता येणार नाही. त्यातले काय किती घ्यायचे, अन् काय सोडून द्यायचे हे अर्थातच आपलयावर अवलंबून राहणार असले तरीही आता हे आधुनिक तंत्र आपल्याला समजून घ्यावेच लागेल. त्यामुळे जे जे नवे ते मीही शिकेन हाही संकल्प कॅलेंडर बदलताना केलेला बरा. अनेकांना भूतकाळात रमायची सवय असते. आमच्या वेळी असे आमच्या वेळी तसे ही कायम रेकॉर्ड असते काही जणांची. नव्या पिढीची जीवन पद्धती एकदम वेगळी असणार आहे. त्यांना नावे ठेवणे सोडा. नव्याची तुम्हीही कास धरायला शिका. आता आजीवन शिक्षणाला महत्त्व आले आहे. कारण आपण सतत शिकलो नाही, आपल्याच जुन्या जमान्यात रमत राहिलो तर आपला निभाव लागणार नाही, दूर फेकले जाऊ. त्यासाठी सतत शिकत राहणे. नव्या पिढीकडून नव्या संकल्पना समजून घेणे, त्या हळूहळू आत्मसात करायला शिकणे, मुख्य म्हणजे कमी बोलणे अन जास्त ऐकणे हे धोरण आता स्वीकारायला हवे. शिक्षण, व्यवसाय, प्रोफेशन, मार्केटिंग, समाजव्यवस्था, राजकारण, अर्थकारण ही सर्वच क्षेत्रे झपाट्याने बदलत आहेत. ते स्वीकारावे लागेल. आपली मते नव्या पिढीच्या गळी उतरवण्याचा अट्टहास चालणार नाही. नव्या पिढीला देखील वाडवडिलांना सांभाळून घ्यावे लागेल. वेळ पडल्यास हात धरुन, आधार देत पुढे न्यावे लागेल. जर प्रत्येक जण एक दुसऱ्यावर अवलंबून असेल तर त्यासाठी समंजसपणा, तडजोड, सहानुभूती, अनुकंपा हे गुणधर्म आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग असले पाहिजेत. एक दुसऱ्याच्या सुख–दुःखात सहभागी होणे, एकमेकांच्या अडचणी, उणिवा समजून घेणे, त्या उणिवांसह त्या व्यक्तीचा स्वीकार करणे हा खरा आपला धर्म असला पाहिजे. दुसऱ्यांनी बदलावे. अवतीभोवतीचे जग बदलावे असे आपल्याला वाटत असेल तर सुरुवात स्वतःपासून केलेली बरी. आपण बदललो, आपले आचारविचार बदलले की अवतीभोवतीचे जग देखील आपोआप बदलेल. या नव्या बदलासाठी सज्ज होऊ या आणि नववर्षाचे स्वागत करु या.

# चला, गावखेड्यांना आत्मनिर्भर बनवू या!

खेड्याकडे चलाही ग्रामीण लोकजीवनाशी निगडित असलेली एक अभिनव चळवळ मानली जाते. राष्ट्रपिता महात्मा गांधी या संकल्पनेतून ही चळवळ इ. स. १९१६ मध्ये सुरू झाली. खऱ्या भारताचे दर्शन खेड्यात होत असल्याने महात्मा गांधीजींनी ङ्गखेड्याकडे चलाफ अशी हाक दिली. त्यात प्रामुख्याने गावखेड्याचे सक्षमीकरण हा महत्त्वपूर्ण हेतू होता; परंतु आजचे वास्तव पाहिले तर खेडी, गावे ओस पडत चालली आहेत. त्याचे कारण उद्योगधंदा आणि रोजगारांसाठी जवळच्या शहरात प्रत्येक घरातील कर्ता व्यक्ती वास्तव्य करता करता तो कधी शहरी बाबू झाला याची त्यालाही कल्पना नसते. तालुका, जिल्हा, तसेच मुंबई, पुणे नागपूर, औरंगाबाद सारख्या राज्यातील शहरांचे भौगोलिक आकारमान हे दिवसेंदिवस वाढत चालले आहे, त्यामागे खेड्यांतून स्थलांतरित होणाऱ्यांची संख्या ही दिवसेंदिवस लक्षणीय आहे. त्यामुळे वाढता रोजगाराचा प्रश्न, वाढती गर्दी यामुळे गांधीजींचा हा मूलमंत्र आर्थिक समस्येचे निराकरण करण्याचा सोपा मार्ग सुचवतो. प्रत्येक गावखेडी स्वयंपूर्ण व्हावीत, ग्रामीण विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न व्हावे, असे महात्मा गांधींनी स्वातंत्र्यपूर्व काळात सांगितले. देशाच्या स्वातंत्र्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये गांधीजींच्या ङ्गखेड्याकडे चलाफ या मूलमंत्राचा दखल घेऊन गावखेड्याच्या विकासासाठी योजना आखली गेली; परंतु त्याकडे म्हणावेसे तसे गांभीर्याने पाहिले गेले नव्हते, असे दुदैवाने म्हणावे लागेल. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी प्रत्येक गावात एक बहुउद्देशीय संस्था स्थापन करण्याची घोषणा केली आहे. यातून गाव खेड्यातच ३२ प्रकारच्या व्यवसायांची संधी उपलब्ध होणार आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून देशातील प्रत्येक गावात बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था, दुग्ध आणि मत्स्यपालन सहकारी संस्था सुरू करण्याच्या मोहिमेचा प्रारंभ शहा यांच्या हस्ते बुधवारी झाला



आहे. येत्या पाच वर्षांत दोन लाख बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था सुरू करण्याचा केंद्र सरकारचा निर्धार आहे. अवघ्या तीन महिन्यांत ११ हजार ६९५ संस्थांची नोंदणी झाली आहे. पहिल्या टप्प्यात नाबार्ड २२ हजार, एनडीडीबी ५६ हजार ५०० अशा संस्था स्थापन करणार असून, दुसऱ्या टप्प्यात अनुक्रमे ४७ आणि ४६ हजार ५०० बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था, दुग्ध आणि मत्स्यपालन सहकारी संस्था स्थापन करण्यात येणार आहेत. याशिवाय राज्यांच्या मदतीनेही हजारो बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था स्थापन केल्या जाणार आहेत. त्यामुळे दोन लाख सहकारी संस्था सुरू करण्यासाठी पाच वर्षांचा काळ लागणार नाही, असा दावाही शहा यांनी केला. गेल्या पंचाहत्तर वर्षांच्या काळात गावखेडीच्या संदर्भाने पुढे शासकीय स्तरावर विविध योजना राबविण्यात आल्या होत्या; परंतु या संकल्पनेत, मोहिमेपासून दुर्गम भागात निसर्ग सान्निध्यात वसलेल्या तांडा, वाडीवस्ती मात्र पूर्णपणे वंचित राहिली आहे. परिणामी तांडा, वाडीवस्त्याच्या तुलनेत गावखेडे पुढारली. पुढे २०१६ मध्ये प्रवाहापासून वंचित असलेल्या तांड्याच्या सक्षमीकरणासाठी ङ्गतांडेसामू चालोफ हे तांडावादी विचार सर्जनशील विचारवंत एकनाथराव नायक यांनी प्रथमच रुजवला. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे. सर्वांमध्ये सलोखा निर्माण व्हावा. खेड्यांची रचना व्यवस्थाबद्ध व्हावी असे ग्रामवादी विचार ङ्गखेड्याकडे चलाफ या संकल्पनेतून मांडले गेले होते. केंद्र सरकारच्या नव्या धोरणानुसार, प्रत्येक गावात एक बहुउद्देशीय संस्था सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे सध्या कागदावर असलेल्या प्राथमिक सहकारी संस्था बंद करण्याचा आणि तेथे नव्याने बहुउद्देशीय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात अशा १५ हजार संस्था बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.सहकारी संस्थेच्या सभासदांना मायक्रो एटीएम आणि किसान क्रेडिट कार्ड दिले जाणार आहे. बहुउद्देशीय सहकारी संस्थांना विविध गावांत सुविधा केंद्र, गॅसपुरवठा, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, वीज वितरण असे विविध ३२ स्वरूपाचे व्यवसाय करण्याची मुभा देण्यात आली आहे. पूर्वीच्या काळी बलुतेदार पद्धत, बार्टर सिस्टम गावात होती. त्यामुळे पैसे, रोख व्यवहारांचा फारसा संबंध येत नव्हता. आता कोणतेही गोष्ट पैशांशिवाय पूर्ण होत नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंत व्यक्तीशी निगडित आर्थिक व्यवहार हा जगण्याचा भाग बनला आहे. त्यामुळे भारताला सुजलाम सुफलाम बनविण्यासाठी पुन्हा एकदा गावे आर्थिकदृष्ट्या खेडी स्वयंपूर्ण करणे ही काळाची गरज आहे. एकदा का गावातील लोकांच्या हातात पैसा खेळू लागला तर गावशिवाराची स्वच्छता, जलसंधारण, शिक्षण, शाश्वत शेती, आरोग्य आदी सोयींकडे अधिक लक्ष देऊन गावांचे स्वरूप पालटता येऊ शकते. स्वच्छ गाव, पाणीदार गाव, वनसंपदेचे गाव, पुस्तकांचे गाव अशी अनेक उदाहरणे आपल्यासमोर आहेत. त्याची संख्या भविष्यात वाढू शकते. गावे समक्ष करण्यासाठी नगरपंचायती आणि मोठ्या ग्रामपंचायती कार्यक्षेत्रामध्ये स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन, जलनिस्सारण, रस्ते, जलसुरक्षा, नदी–नाले–ओढे यांच्यावरील अतिक्रमण या समस्यांनी विक्राळ स्वरूप धारण केले आहे. त्याबाबत सरकारने तातडीने उपाययोजना करायला हव्यात. गावातील लोकांना रोजगाराबरोबर भविष्यातील समस्या आणि अडचणी लक्षात घेऊन नियोजन केल्यास ग्रामीण भागातून शहरात होणारे स्थलांतर नक्की कमी करता येईल. गावातील पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक केल्यास स्थलांतर थांबेल. केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या संयुक्त निधीतून ग्रामीण जीवनाचे संपूर्ण चक्र गतिमान करण्यासाठी खासगी क्षेत्राचीही मदत घेतली तर वावगे ठरणार नाही. केंद्र सरकारच्या सहकार विभागाकडून गावांना केंद्रस्थानी मानून विकासाचे आणि आर्थिक उन्नतीचे नवे मॉडेल तयार केले आहे, त्याचे स्वागतच करायला हवे

# दत्तधाम मधील श्रीदत्त मूर्तीची हजारो भाविकांच्या उपस्थितीत प्राणप्रतिष्ठा

बीड । प्रतिनिधी शहरातील फुलाईनगर भागात गुरुवार दि २६ रोजी श्री.दत्त मुर्तीची प्राणप्रतिष्ठा विधिवत करण्यात आली, यावेळी भाविक दत्तभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या दत्तधाम परिसरातील मंदिराचे बांधकाम भाविकांनी स्वयंप्रेरणेने हाती घेतले होते यात मंदिर आणि मुख्य गाभाऱ्याचे काम पूर्ण झाल्यानंतर प्राणप्रतिष्ठा करण्यात आली, त्याआधी दि २५ रोजी श्रीदत्त मूर्तीची भव्य शोभायात्रा काढण्यात आली या शोभायात्रेत परिसरातील सारे परिवार सहभागी झाले होते. दि २६ रोजी विधिवत प्राणप्रतिष्ठा हजारो भाविकांच्या उपस्थितीत आणि सद्गुरू साडेगावकर महाराज यांच्या हस्ते करण्यात आली,तसेच दि २७ रोजी महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता तिन्ही दिवशी भाविकांनी मोठया प्रमाणावर उपस्थिती लावली होती. बीड शहरातील फुलाई नगर गुरुप्रसाद कॉलनी एकता नगर व्यंकटेश कॉलनी येथील भाविक भक्तांच्या सहकार्याने भव्य आणि दिव्य श्रीदत्त मंदिराचे काम सुरू असून सध्या गाभाऱ्याचे काम पूर्ण झाल आहे अत्यंत सुंदर आणि मनमोहक अशी दत्तमूर्ती देखील आणण्यात आली, दिनांक २५ रोजी दुपारी चार वाजता भगवान दत्तात्रयाच्या मूर्तीची शोभायात्रा काढण्यात आली,आणि दिनांक २६ गुरुवार रोजी सकाळी आठ वाजता यजमान पत्रकार प्रशांत सुलाखे,उद्योजक अतुल संघांनी,शामसेठ क्षीरसागर,संतोष कुलकर्णी, योगेश खडके यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला,या सोहळ्यासाठी श्रीसमर्थ संस्थान साडे भोगलगाव येथील सद्गुरू सुरेश महाराज रामदासी यांची प्रमुख उपस्थिती होती,सायंकाळी चार वाजता प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता तर रात्री ८ ते १० या वेळेत नादब्रह्मच्या स्थानिक कलाकारांचा गुरुवार पंचपदी आणि भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला,दिनांक २७ रोजी याच भागात असलेल्या संदीप कुलकर्णी यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते,या तीनही दिवसात दत्त भक्तांनी मोठी गर्दी केली होती. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे पौरोहित्य संतोष रत्नपारखी, जीवन पाठक, संतोष कुरलेकर,अनिकेत दाणी, सिद्धेश जोशी,आणि केशव पाठक यांनी केले, यावेळी विधिवत कार्यक्रमात प्रायश्चित्त संकल्प, प्रधान संकल्प,गणपती पूजन, मातृका पूजन, नांदीश्राद्ध,देवता स्थापन, अग्निस्थापन, मूर्ती जलाधिवास, नवग्रह हवण, स्नपण, तत्वन्यास, शय्याधिवास, मूर्तीप्राणप्रतिष्ठा, बलिदान पूजन करण्यात आले यावेळी हजारो भाविक उपस्थित होते,परिसरात एकमेव दत्तमंदिर झाल्याने दर्शनासाठी भाविकांची गर्दी वाढू लागली आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण तयारीने कामाला लागा- जगताप, मुळूक, गलधर

## बीड जिल्हा शिवसेनेची बैठक संपन्न!




बीड, प्रतिनिधी– बीडसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसेनेने तयारी सुरु केली आहे. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने काल रविवार, दि.२९ डिसेंबर रोजी बीड जिल्हा शिवसेनेची बैठक दुपारी बारा वाजता हॉटेल ग्रॅंड यशोदा येथे संपन्न झाली.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात राज्याला प्रगतीपथावर नेले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसह विविध योजना राबवून महिलांना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न शिंदे यांच्या कार्यकाळात झाला. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी केलेल्या उल्लेखनिय कामामुळे विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला मोठे यश मिळाले असून राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आली. आता राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील शिवसेनेची सत्ता यावी, या दृष्टीने शिवसेना तयारीला लागली असून मजबुतीने पुढे जाणार आहे. बीड जिल्ह्यात होणा–या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण तयारीने कामाला लागा असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी व्यक्त केले. दरम्यान यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात प्रभाग निहाय गण, गटनिहाय नियोजन व चर्चा झाली. याप्रसंगी बीड जिल्ह्यातील शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना व सर्व अंगीकृत संघटनेचे सर्व पदाधिकारी आजी–
माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिकांनी उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ३० डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## अंबाजोगाईत रोटरी क्लबने केली २४०० विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने शनिवारी सकाळी एकाचवेळी ८ शाळेमध्ये मोफत दंत तपासणी शिबिर झाले. शहरातील २३ दंत चिकित्सक डॉक्टरांनी २४०० विद्यार्थ्यांची तपासणी व औषधोपचार केले. या शिबिराचे उद्घाटन गुरुदेव विद्यालयात झाले. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या डॉ.हर्षा काळे, रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, प्रकल्प संचालक डॉ.श्रीनिवास रेड्डी, सह संचालक डॉ.सचिन पोतदार,रोटरीचे उपाध्यक्ष अजित देशमुख,जगदीश जाजू, प्रा. संतोष मोहिते, राजेंद्र घोडके, डॉ.अनिल केंद्रे,प्रदीप झरकर,स्वप्नील परदेशी,रुपेश रामावत,राधेश्याम लोहिया,सचिन बेंबडे,गणेश राऊत,संभाजी बुर्गे,भिमसेन लोमटे,रमेश देशमुख,यांची उपस्थिती होती.शहरातील गुरुदेव विद्यालय, बालनिकेतन, खोलेश्वर विद्यालय, वेणूताई चव्हाण कन्या विद्यालय,डॉ. राम भालचंद्र विद्यालय,संकल्प विद्यालय,कर्तव्य कर्णबधीर मुलींचे विद्यालय, डॉ.महमद इकबाल विद्यालय या सर्व शाळांमधे २४०० विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली. या उपक्रमात डॉ. हर्षा काळे,डॉ. प्रवीण जोशी,डॉ. उदय सोनी,डॉ.शुभांगी चव्हाण,डॉ.ऋषिकेश घुले,डॉ.अश्विनी घुले,डॉ. शीतल सोनवणे,डॉ.मंगल बाहेती,डॉ.सुजाता डोंगरे,डॉ.पूजा कुंडगिर,डॉ.श्वेता मुंडे,डॉ.दिपाली गिराम,डॉ.अंजली रेड्डी,डॉ. पूनम घुले,डॉ.पूजा लोमटे यांनी तपासणी करून आपला सहभाग नोंदविला. या दंत शिबिराच्या यशस्वितेसाठी रोट्रॅक्ट क्लबचे जतिन कर्णावट,रमन भन्साळी,सुशील गिल्डा,सर्वेश बजाज,संदीप जाधव,सुशील गंगणे, मयूर परदेशी,सूशाल मारू,नेहा जैन यांनी परिश्रम घेतल

## वातावरण बदलामुळे बंद असलेली सीसीआय कापूस खरेदी आजपासून पुन्हा सुरू - संचालक धनंजय गुंदेकर



बीड (प्रतिनिधी) तालुक्यातील कापूस खरेदी वातावरण बदलामुळे बंद होती. अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला असल्याने बीड तालुक्यातील ३० डिसेंबर पर्यंत कापूस खरेदी सीसीआय कडून थांबविली होती. मात्र आता ही कापूस खरेदी पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती धनंजय गुंदेकर, संचालक, छत्रपती श्री शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समिती, बीड यांनी दिली आहे. सीसीआय कडून हमीभाव ७४२१ प्रती क्विंटल प्रमाणे कापूस खरेदी ही बीड तालुक्यात ३ ठिकाणी ४ दिवस तर वडवणी तालुक्यात १ ठिकाणी १ दिवस करण्यात येत आहे. यामध्ये प्रत्येक सोमवारी व बुधवारी सिद्धी ऍग्रो बीड, मंगळवारी साक्षाळपिंप्री येथील श्री नगद नारायण कॉटन, गुरुवारी मैंदा येथील नर्मदादेवी कॉटस्पिन व शुक्रवारी वडवणी येथील श्री हरी ट्रेडिंग कंपनी यांच्याकडे खरेदी सुरू असल्याचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे..

**अशी असेल आठवड्यातील दिवसनिहाय कापूस खरेदी**
**सोमवार - सिद्धी ऍग्रो, बीड**
**मंगळवार - श्री नगद नारायण कॉटन, साक्षाळपिंप्री**
**बुधवार - सिद्धी ऍग्रो, बीड**
**गुरुवार - नर्मदादेवी कॉटस्पिन, मैंदा**
**शुक्रवार - श्री हरी ट्रेडिंग कंपनी, वडवणी**
**शनिवार, रविवार - खरेदी बंद**

# सुरेश धस यांनी आमच्याशी कुठलीही चर्चा न करता आमचे नाव घेऊन केलेले आरोप खोटे -डॉ.महेंद्र लोढा

परळी । प्रतिनिधी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर तोंडाला येईल ते आरोप करत सुटलेल्या आमदार सुरेश धस यांचा आणखी एक धाधांत खोटारडेपणा उघडकीस आला आहे. प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.महेंद्र लोढा व डॉ. राजेंद्र लोढा यांच्या अनंत प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या रुग्णालयास सिरसाळा येथे जमीन देण्याबाबत धनंजय मुंडे यांनी ट्रस्ट मध्ये घेण्याची किंवा अन्य कोणतीही अट घातल्याचे सुरेश धस यांनी केलेले आरोप डॉ.महेंद्र लोढा यांनी फेटाळून लावले आहेत. काही वर्षांपूर्वी अनंत प्रतिष्ठान या आमच्या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून वृद्धाश्रम व एच आय व्ही हॉस्पिटल उभारण्यासाठी तत्कालीन महसूल मंत्री नारायण राणे यांच्या माध्यमातून आम्हाला शिरसाळा येथे जमीन मिळाली होती. त्यासाठी धनंजय मुंडे यांनी आम्हाला मदतच केली. शिवाय त्यांना किंवा त्यांच्या जवळच्या कुणाला अनंत प्रतिष्ठानच्या ट्रस्टमध्ये घेण्याबाबत त्यांनी कोणतीही अट घातली नव्हती. याबाबत सुरेश धस यांनी काल माध्यमांमध्ये केलेले वक्तव्य ऐकून मला धक्काच बसला असे मत डॉक्टर महेंद्र लोढा यांनी व्यक्त केले आहे. त्यावेळी धनंजय मुंडे यांनी या सामाजिक कार्यासाठी मदत तर केलीच शिवाय एखाद्या कंपनीच्या सीएसआर फंडातून काही निधी मिळण्यासाठी ही आपण प्रयत्न करू अशा स्वरूपाचे आश्वासनही आम्हाला दिले होते. डॉक्टर महेंद्र लोढा हे प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ असून त्यांचे यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथे मोठे हॉस्पिटल आहे. आमदार सुरेश धस यांनी बीड येथील मोर्चामध्ये बोलताना लोढा कुटुंबीयाबाबत वक्तव्य करत धनंजय मुंडे यांनी त्यांच्या अनंत प्रतिष्ठान या संस्थेला जमीन देण्यासाठी स्वतः ला ट्रस्टचे अध्यक्ष करा वगैरे अटी घातल्या अशा स्वरूपाचे धादांत खोटे आरोप केले होते. मात्र आमदार सुरेश धस यांनी आमच्याशी कुठलीही चर्चा न करता आमच्या कुटुंबाचं नाव घेऊन धनंजय मुंड यांच्यावर खोटे व चुकीचे आरोप केले आहेत. जेव्हा आम्ही धनंजय मुंडे यांना भेटलो तेव्हा त्यांनी आम्हाला मदतच केली असे डॉक्टर महेंद्र लोढा यांनी म्हटले आहे. दरम्यान तोंडाला येईल ते बोलत सुटलेले आमदार सुरेश धस हे याआधीही परळीतील व्यापारी अमोल डुबे यांच्या प्रकरणात तोंडघशी पडलेले आहेत. परळीच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शिरसाळा येथील व्यापारी संकुलाच्या बाबतीत देखील संपूर्ण कागदपत्रे पुरावेच बाहेर आल्याने त्याही प्रकरणात सुरेश धस हे धादांत खोटारडे आरोप करतात हे उघडकीस आले. तर अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्याबाबत केलेल्या बेताल वक्तव्यावरून देखील सुरेश धस अडचणीत येण्याची शक्यता आहे.

## मारफळा विद्यालयाचे वरिष्ठ लिपिक विठ्ठलराव बाबर सेवानिवृत्त

### रणवीरराजे पंडित यांच्या उपस्थितीत सेवापूर्ती सोहळा संपन्न



गेवराई :

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई संचलित माध्यमिक विद्यालय मारफळा येथील वरिष्ठ लिपीक श्री.विठ्ठल सोपानराव बाबर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त गुरुवार दि.२६ डिसेंबर रोजी सेवापूर्ती कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून शारदा स्पोर्ट अकॅडमीचे संचालक युवा नेते रणवीर पंडित, अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गुलाबराव कुटे, तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, मारफळा चे सरपंच शरदराव कबले , गणपत महाराज उबाळे, शिवाजी महाराज कुटे, माजी सभापती वसंतराव उबाळे, माजी उपसभापती ज्ञानोबा आबुज, प्रा.काशिनाथ गोगुले, बाजार समितीचे सदस्य नारायणराव डरपे, शाळेचे मुख्याध्यापक बी.टी.पवार, शिवाजीराव कुटे यांच्यासह निरोप समारंभाला पंचक्रोषीतील मान्यवर व शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी युवा नेते रणवीरराजे पंडित यांच्या हस्ते संस्थेच्या वतीने सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक विठ्ठलराव बाबर यांचा सपत्नीक यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना रणवीरराजे म्हणाले की, बाबर सर यांनी त्यांच्या कार्यकाळात प्रामाणिक सेवा दिली आज ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा सेवापुर्ती समारंभ ही त्यांच्या कार्याची पावती आहे. असे गौरवोद्गार याप्रसंगी त्यांनी व्यक्त करुन पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भागवत ठोंबरे तर उपस्थितांचे शेख सर यांनी आभार व्यक्त केले. यावेळी माध्यामिक विद्यालय व वरिष्ठ महाविद्यालय, मारफळा चे सर्व शिक्षक, पालक वर्ग तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाकिस्तान अफगाणिस्तान लढाईत पाकिस्तानच्या १९ सैनिकांचा मृत्यू

### पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात सीमावाद सुरू आहे.



इस्लामाबाद : पाकिस्तान अफगाणिस्तान सीमेवर लढाई सुरू आहे. या पाकिस्तान अफगाणिस्तान लढाईत पाकिस्तानच्या १९ सैनिकांचा आणि तीन नागरिकांचा मृत्यू झाला. पाकिस्तानच्या वायुदलाने अफगाणिस्तानमध्ये एअर स्ट्राईक केला होता. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून अफगाणिस्तानने पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे. तालिबानच्या हल्ल्यात पाकिस्तानमधील खोस्त प्रांतातील अली शिर जिल्ह्यातील अनेक लष्करी चौकी पहारे जळून खाक झाल्याचे वृत्त आहे. तर पाकिस्तानच्या तोफगोळ्यांच्या माऱ्यात अफगाणिस्तानमध्ये डंड-ए-पतन जिल्ह्यात तीन नागरिकांचा मृत्यू झाला आहे. अतिरेक्यांना लक्ष्य करण्यासाठी पाकिस्तानने केलेल्या एअर स्ट्राईकमध्ये अफगाणिस्तानच्या ५१ नागरिकांचा मृत्यू झाला. यानंतर अफगाणिस्तानने पाकिस्तान विरोधात कठोर कारवाई सुरू केली. अफगाणिस्तानमधून पाकिस्तानवर सतत अतिरेकी हल्ले सुरू आहेत. हे हल्ले करणाऱ्या अतिरेक्यांना अफगाणिस्तान शस्त्र, पैसा, अन्न पाणी औषधे आणि लपण्यासाठी जागा पुरवत असल्याचा आरोप पाकिस्तानने केला आहे. तर पाकिस्तानचा आरोप अफगाणिस्तानने फेटाळला आहे. इस्लामाबाद येथील सेंटर फॉर रिसर्च अँड सिक्युरिटी स्टडीजच्या एका अहवालानुसार पाकिस्तानमध्ये २०२३ मध्ये अतिरेकी हल्ल्यांमध्ये जीवितहानी होण्याचे प्रमाण हे २०२२ च्या तुलनेत ५६ टक्के जास्त आहे. अतिरेकी हल्ल्यांमध्ये सुमारे १५०० नागरिक आणि सुमारे ५०० जवानांचा मृत्यू झाला आहे. मागील काही महिन्यांपासून पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात सीमावाद सुरू आहे. इंग्रजांनी आखून दिलेली ड्युरंड रेषा अफगाणिस्तानला अमान्य आहे तर अफगाणिस्ताच्या भूमिकेला पाकिस्तानचा विरोध आहे. आता हा वाद विकोपाला गेल्याचे चित्र आहे. ड्युरंड रेषा किंवा ड्युरंड लाईन म्हणजे काय ? ब्रिटिश इंडियाचा अधिकारी मॉर्टिमर ड्युरंड याने निश्चित केलेली सीमारेषा म्हणजे ड्युरंड रेषा किंवा ड्युरंड लाईन. अफगाणिस्तान आमिरात आणि ब्रिटिश यांच्यातले संघर्ष थांबवण्यासाठी १८९३ साली ड्युरंड रेषा आखण्यात आली. पण ही रेषा ब्रिटिशांनी बळाच्या जोरावर पश्तुन समाजाला विभागून अफगाणिस्तानची ताकद कमी करण्यासाठीच केली होती. आता पाकिस्तानने नव्याने चर्चा करून नवी सीमारेषा आखावी, अशी भूमिका अफगाणिस्तानने घेतली आहे. पश्तुन हे अफगाणिस्तानचे आहेत त्यामुळे त्यांना त्यांच्या हक्काची जमीन मिळायला हवी, अशीही भूमिका अफगाणिस्तानने घेतली आहे

## शनी जन्मोत्सवानिमित्त कीर्तन महोत्सव व भागवत कथा; बीडयेथील शनी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

बीड: शनीच्या साडेतीन पीठांपैकी अर्धपीठ असणारे बीडचे शनी मंदिर आहे. विक्रमादित्य राजाच्या काळापासून हे मंदिर अस्तित्वात आहे. जागृत देवस्थान म्हणून मंदिराची ख्याती असून देशभरातून भाविक मोठ्या संख्येने इथे र्शनासाठी येतात. यावर्षी दि. ०७ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता शनी जन्म (प्रकटदिन) आहे. त्यानिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दि.०१ जानेवारी ते ०८ जानेवारी दरम्यान भव्य कीर्तन महोत्सव व भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. मागील चार वर्षांपासून शनी जन्मोत्सवानिमित्त कीर्तन महोत्सव भव्य स्वरूपात साजरा केला जातो. आठ दिवस यानिमित्ताने पहाटे काकडा, सकाळी १० ते १२ गाथाभाजन, दुपारी १ ते ५ भागवतकथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ०८ ते १० कीर्तन व त्यानंतर हरिजागर असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. यावर्षी भागवत कथा प्रवक्ते सचिन महाराज सपकाळ यांची संगीत भागवत कथा आयोजित करण्यात आली आहे. कीर्तन महोत्सवात ह.भ.प. कैलास महाराज गवळी, भाऊसाहेब महाराज धांडे, गुरुवर्य प्रा.परशुराम महाराज मराडे, गणेश महाराज वारींगे, संतोष महाराज डोंगरे, त्र्यंबक महाराज मातकर, श्रीकृष्ण महाराज उबाळे यांची कीर्तने तर ह.भ.प.नितीन महाराज पिसाळ यांचे विशेष प्रवचन होणार आहे. दि.०७ जानेवारी रोजी सायंकाळी ठीक ०६ वाजता शनी जन्मोत्सवानिमित्त महारुद्राभिषेक होईल. दि. ०८ जानेवारी रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत बंकटस्वामी मठाचे मठाधिपती गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे काल्याचे कीर्तन व त्यानंतर महाप्रसाद होईल. शनी भक्तांनी वरील कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन शनी मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष रामनाथ खोड व विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# दक्षिण भारताच्या महायात्रेला माळेगावात पारंपारिक उत्साहात सुरुवात जिल्हाधिका-यांनी सपत्नीक घेतले श्री खंडेरायाचे दर्शन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या माळेगाव यात्रेला आज प्रारंभ झाला. दुपारी श्री खंडोबाची देवस्वारी निघाली. यळकोट यळकोटफ जय मल्हारच्या गजरात बेल भंडारा, खोब-याची उधळण करीत लाखो भाविकांनी देवस्वारीचे दर्शन घेतले. माळेगाव येथील श्री खंडोबाच्या यात्रेस पारंपारिक पद्धतीने सुरुवात झाल्यानंतर मुख्य रस्त्याने देवस्वारी निघाली. देवस्वारीचे विश्रामगृह येथे आगमन झाले होते. यावेळी पालखी दर्शनाला राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची उपस्थिती होती. त्यांच्यासोबत आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य राजकुमार मुक्कावार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत मंजूषा कापसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगिता देशमुख, प्राथमिक शिक्षणाधिकारी सविता बिरगे, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता अमोल पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ, अमित राठोड, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. घुले, कृषी विकास अधिकारी सचिन कपाले, कार्यकारी अभियंता अशोक भोजराज, पंचायत समिती दशरथराव आडेराघो, सरपंच प्रतिनिधी हनुमंत हुलगंडे, ग्रामपंचायत अधिकारी बी. सी. देवकांबळे, ग्रामपंचायतचे पदाधिकारी व हजारो भाविकांची उपस्थिती होती. यावेळी पालखीचे मानकरी गणपतराव मल्हारराव नाईक (रिसनगाव), गोविंदराव नागेशराव महाजन (कुरुळा), व्यंकटराव मारोतीराव पांडागळे (शिराढोण),



खुशालराव भगवानराव भोसीकर (पानभोसी) व गोविंदराव बाबाराव नाईकवाडे (पानभोसी), पांडुरंग नारायण पाटील (माळेगाव), मल्हारी रावसाहेब पाटील (माळेगाव), विजयकुमार शंकरराव कनकदंडे (आष्टूर) व अंबादास खंडेराव जहागीरदार (माळेगाव) यांचा देवस्थानच्यावतीने मानाचा फेटा बांधून गौरव करण्यात आला. यावर्षी मंदिराकडे जाणारा रहदारीचा मुख्य रस्ता मोकळा केल्याने भाविकांना दर्शनासाठी सहज जाणे शक्य झाले. याचबरोबर यावर्षी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून अधिक सुरक्षितता घेतली जात आहे. तसेच प्लास्टिक मुक्त व कचरा मुक्त होण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेने उत्तम नियोजन केलेले आहे. तसेच पार्किंग, सुरक्षा व्यवस्था याबाबत योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे. यावेळी पालखी सोहळ्यात पारंपारिक वेशभूषा परिधान केलेले वाघ्या मुरळी, वासुदेव, पारंपारीक पध्दतीने कवड्याच्या माळी, लांब हळदीचा मळवट, हातापायावर चाबकाचे फटके मारत वाघ्या मुरळी सहभागी झाले होते. त्यांना पाहण्यासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. जिल्ह्यातील महत्त्वाच्या उत्सवात सहकार मंत्र्यांसोबतच जिल्हाधिकारी अभिजीत राऊत कुटुंबासह सहभागी झाले होते. या यात्रेसाठी नांदेड जिल्हा परिषद, लोहा पंचायत समिती, माळेगाव ग्रामपंचायत मार्फत येणा-या भाविकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. आजपासून सुरू झालेली यात्रा पुढे ५ तारखेपर्यंत सुरू राहणार असून या यात्रेतील शासकीय कार्यक्रम राष्ट्रीय दुखवट्यामुळे पुढे ढकलण्यात आले आहे. दोन जानेवारीपासून कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. देशभरातील भाविक या ठिकाणी पुढील काळात येणार असून पशुधनाचा मोठा बाजार या ठिकाणी या कालावधीत सुरू होतो. तसेच पशुधन संदर्भातील आवश्यक वस्तू विक्रीचेही दुकाने मोठ्या प्रमाणात असतात. याशिवाय या यात्रेत देणा-या भाविकांसाठी २ जानेवारीला लावणी महोत्सव ही आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील अनेक सुप्रसिद्ध लावणी कलाकार व त्यांच्या अनेक चमू या ठिकाणी आपली कला साजरी करणार आहे. या यात्रेला कुलदैवताची यात्रा समजणा-या अनेक जमातीचे नागरिक आजपासून या ठिकाणी दाखल झाले आहे. आपल्या पारंपारिक पेहेरावात ते या ठिकाणी दाखल झाले आहेत. आजच्या यात्रेदरम्यान भारताच्या ग्रामीण भागातील अनेक कलांचे पालखी महोत्सव दरम्यान नागरिकांनी सादरीकरण केले. या यात्रेदरम्यान पोलीस विभागाने चोख, बंदोबस्त ठेवला असून मोठ्या प्रमाणात पोलीस दल या ठिकाणी कार्यरत आहे. नागरिकांनी कोणत्याही अपवादात्मक परिस्थितीमध्ये पोलिसांची मदत घ्यावी, असे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. उत्तम जागा पाहूनी मल्हाजरी, देव नांदे गड जेजुरी, उत्तुम रायाची जेजुरी गडाला नऊ लाख पायरी या जयघोषात माळेगावच्यात यात्रेत पारंपारीक वाद्याने खंडेरायाची सेवा अर्पण करायला सुरुवात केली. पारंपारीक गितासोबत डफ, तुनतुने आणि जयघोषाच्या गजरात अवघा परिसर दुमदुमला. उर्वरित नियोजित कार्यक्रम २ ते ५ जानेवारी पर्यंत होतील.

## सर्व ग्रामपंचायतींचे कामकाज तीन दिवस बंद

बीड । प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्याची धक्कादायक घटना काही दिवसांपूर्वी घडली. सदर घटनेतील काही आरोपींना पोलिसांनी अटक केली. मात्र, या घटनेतील मुख्य आरोपी मात्र अद्यापही फरार आहेत, त्यांना अटक करण्याच्या मागणीसाठी आणि संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी (२८ डिसेंबर) बीड जिल्ह्यात सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. अशातच या घटनेचे पडसाद आता राज्यभरात उमटताना दिसत आहेत. दरम्यान, बीड जिल्ह्यातील सरपंच हत्या प्रकरण, धाराशिव जिल्ह्यातील सरपंचाला पेट्रोलने जिवंत जाळण्याचा प्रयत्न यासह राज्यात सतत सरपंचांवर होणारे जीवघेणे हल्ले, अशा घटनांच्या निषेधार्थ राज्यभरातील सर्व ग्रामपंचायतींचे कामकाज येत्या ३१ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान ३ दिवस बंद ठेवून शासनाचे लक्ष वेधण्याचा निर्णय महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेने घेतला आहे. महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेतर्फे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनही देण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावचे आदर्श माजी सरपंचाचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. ही घटना ताजी असतानाच पुन्हा सरपंचावरील जीवघेण्या हल्ल्याच्या दुस-या घटनेने महाराष्ट्र हादरला आहे. धाराशिव जिल्ह्यातील सरपंचाच्या कारची तोडफोड करून पेट्रोलने जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यावरून सरपंच संघटना आक्रमक झाली आहे. राज्यात अशा घटना घडणे हे अतिशय चिंताजनक असून सरपंचांनी गावगाडा चालवायचा कसा? त्यांच्या सुरक्षेची हमी घ्यायची कुणी? असा सवाल करत अशा घटनावर आळा घालण्यासाठी शासनाने कठोर पावले उचलावीत. सरपंच सुरक्षेसाठी कायदा करावा, हत्या प्रकरणातील आरोपींना तातडीने अटक करून त्या मागच्या मास्टर माईंडचा शोध घेण्यात यावा. सरपंच तथा ग्रामपंचायत पदाधिका-यांना कायदेशीर संरक्षण देण्यात यावे, अशी सरपंच संघटनेची मागणी आहे.

# आम्ही सर्व तुझ्या पाठीशी, गौतमी पाटीलकडून प्राजक्ता माळीच्या भूमिकेचे समर्थन

### प्राजक्ता माळीने घेतलेल्या भूमिकेचे कलाक्षेत्रातून कौतुक केले जात आहे

**बीड,/प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून बीडमधील मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या प्रकरण चर्चेत आहे. या घटनेवरुन सध्या राजकारण तापले आहे. या घटनेचा मास्टरमाईंड वाल्मिकी कराड असल्याचे बोललं जात असून तो मंत्री धनंजय मुंडेंच्या जवळचा आहे, असा आरोप सातत्याने होत आहे. त्यामुळे विरोधकांकडून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. त्यातच भाजप आमदार सुरेश धस यांनी माध्यमांशी बोलताना अभिनेत्री प्राजक्ता माळी यांचे नाव घेतले होते. यानंतर प्राजक्ता माळीने पत्रकार परिषद घेत सुरेश धस यांनी आपली माफी मागावी, अशी मागणी केली. तुम्ही फक्त महिलांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवत नाही तर त्यांच्या कर्तृत्वावरही शिंतोडे उडवत आहात. कुणाच्याही कुबड्यांशिवाय एखादी महिला



यशस्वी होऊ शकत नाही का? असा प्रश्नही प्राजक्ता माळीने विचारला. प्राजक्ता माळीने घेतलेल्या भूमिकेचे कलाक्षेत्रातून कौतुक केले जात आहे. नृत्यांगणा गौतमी पाटीलने प्राजक्ता माळीचे समर्थन केले आहे.

गौतमी पाटीलने नुकतंच एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओत गौतमी पाटील ही प्राजक्ता माळीने घेतलेल्या भूमिकेचे समर्थन करताना दिसत आहे. प्राजक्ता तू जे काही बोललीस ते सर्व बरोबर होतं. आम्ही सर्व कलाकार तुझ्यासोबत आहोत, असेही गौतमी पाटीलने म्हटले आहे.

प्राजक्ता तू जे काही बोललीस ते सर्व बरोबर होतं. आम्ही सर्व कलाकार तुझ्यासोबत आहोत. मी देखील एक कलाकार आहे. त्यामुळे मलाही तुम्हाला विनंती करायची की एखाद्या कलाकाराला कलाकाराच्या जागेवर राहू द्या, त्याला कोणत्याही नेत्यासोबतच नव्हे तर कोणत्याही व्यक्तीसोबत त्याचे नाव जोडू नका. तुम्ही कलाकाराला सपोर्ट करा. तुम्ही कलाकाराच्या पाठीमागे उभे राहा. तुम्ही प्रेक्षक आमच्यावर प्रेम करता. आम्ही सर्वजण तुझ्यासोबत आहोत. तू या गोष्टींकडे अजिबात लक्ष देऊ नको. तू अशीच पुढे जात राहा. हसत राहा आणि खूप छान राहा, असे गौतमी पाटील म्हणाली.

### प्राजक्ता माळीने व्यक्त केली खत

प्राजक्ता माळीने काल पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत तिने सुरेश धस यांच्या वक्तव्याचा आपल्या शैलीत समाचार घेतला. परळीला कधीच पुरुष कलाकार गेला नाही का हो, कार्यक्रमाला. त्यांची नावे का येत नाहीत. इव्हेंट मॅनेजमेंटचं सांगायचं तर पुरुष कलाकारांचं नाव घेतात. महिला कलाकार छोट्या कुटुंबातून येऊन संघर्ष करतात. पुढे येतात. आणि तुम्ही असं बोलून त्यांचं नाव डागळताङ्क अशी खंत प्राजक्ता माळी यांनी बोलून दाखवली.या आधीही प्रथितयश नेत्यांबरोबर फोटो आहेत. मान्यवरांबरोबर फोटो आहेत. त्या फोटोचा रेफरन्स उचलून तुम्ही कुणाही बरोबर नाव जोडणार का? हे एक महिला म्हणून, महिला कलाकार म्हणून मला ही बाब निंदनीय वाटतं. राज्यातील राजकारण्यांना ही गोष्ट शोभत नाहीङ्क असं स्पष्ट मत प्राजक्ता माळी यांनी व्यक्त केलं.

# अखेर पंकजा मुंडे यांची पहिली प्रतिक्रिया, स्वत:ला काहीतरी मिळवण्यासाठी काहीही

बीडचे मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावर भाजप नेत्या तथा पशुसंवर्धन आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची प्रतिक्रिया समोर आलेली नाही. भाजप नेते सुरेश धस यांनी बीडमधील आक्रोश मोर्चात पंकजा मुंडे यांना संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट का घेतली नाही? म्हणत प्रश्न उपस्थित केला होता. सुरेश धस यांनी अप्रत्यक्षपणे पंकजा मुंडे यांच्यावर निशाणा साधला होता. यानंतर आता पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यावरुन अप्रत्यक्ष निशाणा साधला आहे. सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका करत असताना इव्हेंट मॅनेजमेंटचा उल्लेख करत प्राजक्ता माळी, रश्मिका मंदाना आणि सपना चौधरी यांची नावे घेतली होती. याआधी करुणा शर्मा यांनी एका व्हिडीओत प्राजक्ताचं नाव घेतल्यामुळे तिला सोशल मीडियावर सातत्याने ट्रोल केलं जात होतं. यानंतर सुरेश धस यांनी प्राजक्ताचं नाव घेतल्यानंतर तिने पत्रकार परिषद घेत भूमिका मांडली. तसेच तिने राज्य महिला आयोगातही सुरेश धस यांच्याविरोधात



तक्रार केली. यानंतर आता पंकजा मुंडे यांनी ट्विट करत प्राजक्ता माळी हिचं समर्थन केलं आहे. पण संतोष देशमुख हत्या प्रकरणावर पंकजा मुंडे यांनी फार काही भाष्य केलेलं नाही.पंकजा मुंडे नेमकं काय म्हणाल्या?ङ्कङ्कशक्तीफ शिवाय कुठल्याही नकारात्मक ऊर्जेचा संहार होऊ शकला नाही. त्रिदेवही थकले की शक्तीचे आवाहन लागायचे. त्रिदेव कोणालाही वरदान द्यायचे आणि शक्ती संहार करायची. दुर्दैवी घटनाफ हे कलयुगातील स्वतःला काहीतरी मिळवण्यासाठी काहीही करणा-यांसाठी खाद्य आहे. भावना कुठे आहेत?

चिमुकल्यांचे बलात्कार, पाशवी अत्याचार आणि निघृण हत्या या थांबवणे शक्य आहे ना. पण कायद्याने, नियमाने! ते राहिले बाजूला नुसती चिखलफेक, असं पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत.

## पुढाऱ्यांचा नाटकीपणा जनतेसमोर उघडा पडला-फारूक पटेल

बीड । प्रतिनिधी मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी. मोर्चाच्या माध्यमातून काही पुढाऱ्यांनी केलेला नाटकीपणा काल जनतेसमोर आला आहे. दुःखद घटनेच्या प्रसंगी पुढाऱ्यांनी केलेली भाषणे, लोकप्रतिनिधीचे बोलतानाचे हावभाव आणि चित्रपटातील डायलॉग हा सर्व प्रकार लोकांना पटलेला नाही. यातून केवळ आणि केवळ ना. धनंजय मुंडे यांच्या विरुद्ध असलेला वयक्तिक विरोध दिसून आला. धनंजय मुंडे यांचे राजकारण संपवण्याची भाषा असलेली चॅटिंग आणि दुःखद घटनेचा मसाला म्हणून केलेला शब्दप्रयोग म्हणजे या पुढाऱ्यांना देशमुख यांच्या हत्येचे दुःख अजिबात नाही. या सर्वांनी त्यांची राजकीय पोळी भाजण्यासाठी केलेला हा प्रयत्न असल्याचे बीड नगरपालिकेचे गटनेते तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते फारुख पटेल यांनी म्हटले आहे. बीड जिल्ह्याचे नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी नेहमीच सामाजिक धोरण समोर ठेवून राजकारण केलेले आहे. त्यांनी आतापर्यंत समाजकारणात कधीच जातीय द्वेष करत कामे केलेली नाहीत. अठरापगड जातीला सोबत घेऊन चालणारा नेता म्हणून धनंजय मुंडे यांची ओळख आहे. त्यामुळेच आजही सर्व जाती धर्मातील लोक त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या माणुसकीला काळीमा फासणारी आणि मन सुन्न करणारी आहे. या प्रकरणातील जे कोणी उर्वरित आरोपी असतील त्यांना अटक करून फासावर लटकवा. हत्या प्रकरणात ज्यांची ज्यांची नावे पुराव्यानिशी सिद्ध होतील त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा द्या अशी मागणी फारुख पटेल यांनी केली आहे. मात्र या प्रकरणात ज्या पद्धतीचे राजकारण सुरू आहे ते थांबवणे गरजेचे आहे. मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव विनाकारण या प्रकरणाशी जोडले जात आहे. राजकीय सोयीसाठी एखाद्या कर्तुत्वान आणि जनतेतून पुढे आलेल्या नेत्याला टार्गेट करणे कितपत योग्य आहे ? तपास यंत्रणेत कुठेही त्यांचे नाव किंवा सहभाग समोर आलेला नाही. तरीही त्यांच्यावर गंभीर आरोप करणे हे लोकप्रतिनिधींना शोभणारे आहे का ? धनंजय मुंडे हे केवळ जिल्ह्याचे नव्हे तर राज्याचे नेते आहेत. त्यांनी स्वकर्तृत्वावर आणि जनतेच्या आशीर्वादावर राज्य गाजवलेले आहे.



## बिबट्याच्या हल्ल्यात जरेवाडीत वासराचा तर धोपटवाडीत गाईचा मृत्यू

पाटोदा । प्रतिनिधी तालुक्यातील जरेवाडी येथील शेतकरी सोनाजी दगडू जरे यांच्या वासरावर (गो-हा) दि.२६ गुरुवार रोजी व धोपटवाडी येथील शेतकरी राजेंद्र अशोक डांभे यांच्या गाईवर दि.२७ शुक्रवार रोजी बिबट्याने हल्ला करून गाय- वासराचा फडशा पाडला. सबंधित शेतकऱ्यांची गुरे चरत असताना बिबट्याने अचानक वासरू व गाईवर हल्ला केल्याने गाय व वासरांचा मृत्यू झाला. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.बिबट्याच्या हल्ल्यामुळे पिंपळवंडी व परिसरातील गुराखी व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.घटनेचा पशुवैद्यकीय व संबंधित विभागाने घटनास्थळी जाऊन पंचनामा करून पुढील कार्यवाहीसाठी शासनास माहिती कळविली आहे.वन विभागाच्या वतीने श्रीकांत काळे वनपरिक्षेत्र अधिकारी पाटोदा यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल अजय देवगुडे,वनरक्षक व्ही.एस.पवार, वनसेवक शहादेव पवार,पोपट पवार,विजय जाधव यांनी पंचनामा केला आहे. बिबट्याच्या हल्ल्यात गाईचा व वासराचा (गो-हा) मृत्यू झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.त्यांना शासनामार्फत आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी होत आहे.परिसरातील डोंगरात शेत परिसरात बिबट्यांचा संचार वाढला असून शेतकरी,गुराखी यांनी रात्रीअपरात्री एकट्याने न फिरता स्वतःची काळजी घ्यावी असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात येत आहे.परिसरात रानडुकरांची संख्या वाढत असून रानडुकरे हाता-तोंडाशी आलेल्या पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी करीत आहेत.तर बिबट्यासारखे वन्यप्राणी पशुधनावर हल्ला करून बळी घेत आहेत. अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. रान डुकरे व वन्यप्राण्यापासून होणाऱ्या संकटापासून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने काहीतरी ठोस उपाय योजना करून रानडुकरे व बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी शेतकरी मागणी करीत आहेत.

## सोशल मिडीयावरुन दहशत निर्माण करणाऱ्या पोस्ट व्हायरल केल्यास कठोर कारवाइ

बीड जिल्हा पोलीस अधिक्षक श्री नवनीत काँवत यांनी जिल्हयातील सर्व जनतेला आवाहन केले आहे की, कोणीही मोबाईल व इंटरनेटचा वापर करुन आपल्याकडे असलेले वैध अथवा अवैध शस्त्राचे (फोटो व्हीडीओ) सोशल मिडीयाव्दारे प्रदर्शित करु नये. तसेच एखाद्या मारामारीच्या घटनेतील रेकॉर्ड केलेला फोटो/व्हीडीओ, शिव्या देतांनाचा व्हिडीओ अथवा समाजात दहशत किंवा भिती निर्माण होईल अशी कोणतीही पोस्ट कोणत्याही सोशल मिडीया अकाउंटवरुन शेअर करु नये, अथवा फॉरवर्ड करु नये. तसेच ज्यांनी कोणी यापुर्वी अशा प्रकारच्या पोस्ट सोशल मिडीयाव्दारे प्रदर्शित केल्या असतील/शेअर केल्या असतील किंवा फॉरवर्ड केल्या असतील त्या त्यांनी तात्काळ सोशल मिडीयावरुन डिलिट कराव्यात. समाज माध्यमांवर (सोशल मिडीया) अशा प्रकारे कोणीही शस्त्राचे, मारामारीचे अथवा शिवीगाळ केल्याचे किवा ज्यामुळे समाजात भिती व दहशत निर्माण होईल असे फोटो व्हीडीओ प्रदर्शित करील, लाईक करील किंवा फॉरवर्ड करील तसेच ज्यांनी कोणी यापुर्वी सोशल मिडीयावरुन अशा पोस्ट केल्या आहेत. परंतू आम्ही दिलेल्या सुचनेनंतरही त्या पोस्ट डिलिट केल्या नाहीत. तर अशा व्यक्तींविरुध्द तात्काळ भारतीय न्याय संहिता, माहिती तंत्रज्ञान अधिनियम तसेच इतर कायद्यान्वये योग्य ती कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल

# आरोपींची संपत्ती जप्त करा आणि बंदुकीसोबत ज्याचे फोटो आहेत, त्या सर्वांचे परवाने रद्द करा

### संतोष देशमुख हत्या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सीआयडीला निर्देश

मुंबई : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रकरणातील मुख्य आरोपी १९ दिवसांपासून फरार आहेत. त्यामुळे बीड पोलिसांकडून तपास आता सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे. देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ आज सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. या पार्श्वभूमीवर संबंधित आरोपींची संपत्ती जप्त करण्याची प्रक्रिया तातडीने सुरु करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सीआयडीचे अतिरिक्त महासंचालक बुरडे यांना दिले आहेत. तसेच बंदुकीसोबत ज्यांचे-ज्यांचे फोटो आहेत, ते जर खरे असतील तर त्या सर्वांचे परवाने रद्द करण्याची प्रक्रिया देखील तातडीने सुरू करा, अशा सूचना बीड पोलिस अधीक्षकांना दिल्या आहेत. दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्याकडून गेल्या काही दिवसांपासून सातत्याने बीड जिल्ह्यामध्ये गन कल्चर सुरू असल्यावरून सरकारला लक्ष्य केले जात आहे. ट्विटच्या माध्यमातून अनेक फोटो आणि व्हिडिओ अपलोड केले आहेत. यावरून बीडमध्ये मिशाही न फुटलेल्या पोरांसोरांच्या हाती बंदूक दिसून येत आहेत. खंडणीखोर फरार वाल्मिक कराडच्या मुलाचाही त्यांनी फोटो पोस्ट केला असून त्याच्याही कमरेला बंदूक दिसून येत आहे. यानंतर आता देवेंद्र फडणवीस यांनी कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. अंजली दमानिया यांनी केलेल्या दाव्यानुसार बीड, परभणी, अमरावती या ठिकाणी सर्वात जास्त परवाने दिल्याचे म्हटलं आहे. बीड जिल्ह्यामध्ये तब्बल १ हजार २८१ जणांकडे शस्त्र परवाना आहे. दरम्यान, परवाना देताना सर्व प्रकारची शहानिशा करूनच परवाना दिला जातो. यावेळी गुन्हेगारी पार्श्वभूमी सुद्धा तपासली जाते. मात्र बीड जिल्ह्यामध्ये टपरी पोरं सुद्धा ज्या पद्धतीने बंदूक कमरेला लावून फिरत आहेत त्यावरून पोलिसांनी खेळण्यातील बंदूक दिल्याप्रमाणे परवाने दिले आहेत का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. बीडमध्ये तीन दिवसांपूर्वी कैलास फडला अटक केली आहे. त्याचाही हवेत गोळीबार करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला होता.



This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com